# जिल्हा परिषद पालघर

जाक्र.पाजिप/बाक/नियो/२०२३/१५६७
महिला व बालविकास विभाग
जिल्हा परिषद पालघर
दिनांकः २८ /१२/२०२३

जाहीर नोटीस

**विषय - महिला व बाल विकास विभाग, जि.प. पालघर अंतर्गत**
किशोरवयीन मुलींना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मासिक पाळी- व्यवस्थापन, स्वच्छता आणि जीवन कौशल्य विकसन प्रशिक्षण देणे.
अंतर्गत प्रशिक्षण पुस्तिका व मार्गदर्शनपर चार्टस पुरविणे बाबत.

महिला व बाल विकास विभाग, जि.प. पालघर अंतर्गत किशोरवयीन मुलींना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मासिक पाळी- व्यवस्थापन, स्वच्छता आणि जीवन कौशल्य विकसन प्रशिक्षण देणेचे आहे, यासाठी "प्रशिक्षण पुस्तिका, मार्गदर्शनपर चार्टस पुरविणे" पुरविणेचे आहे.

या कामी इच्छुक पुरवठादारांकडून दि. २८ .१२.२०२३ ते दि. ०३.०१. २०२४ या दरम्यान खालील स्वाक्षरी करणा-यांच्या नावे खालील प्रमाणे तपशिलाच्या स्वरुपात दरपत्रके मागविण्यात येत असुन, सदरची सिलबंद दरपत्रके दि. ०४/०१/२०२४ रोजी उघडणेत येतील. कोणतेही दरपत्रक स्विकारणे तसेच मंजुर, नामंजुरीचा अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | दर |
|---|---|---|
| १ | पुस्तक छपाई हाफ़ साईज १/८, १६ पाने, ७० GSM, कव्हर पेज फ़ोर कलर (१६ Page book) | एकत्रित दर (सर्व करांसहीत) |
| २ | पुस्तक छपाई हाफ़ साईज १/८, ६० पाने, ७० GSM, कव्हर पेज फ़ोर कलर (६० Page book) | एकत्रित दर (सर्व करांसहीत) |
| ३ | चार्ट प्रिंटींग A४ साईज कलर प्रिंट दोन्ही बाजू (१७० GSM) | एकत्रित दर (सर्व करांसहीत) |

(प्रविण भावसार)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी
(बा.क.) जिल्हा परिषद पालघर

प्रत- १. सुचना फ़लकावर प्रसिद्धीसाठी
२. जि.प. वेबसाईट वर प्रसिद्धीसाठी

दर पत्रक अटी / शर्ती

१) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक-भाखंस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर २०१६ मध्ये नमुद सर्व अटी व शर्ती पुरवठादारास बंधनकारक राहतील.

२) दरपत्रकाबाबतची पुढील कार्यवाही महिला व बाल विकास विभागामार्फत करण्यात येईल.

३) उपलब्ध तरतुदीच्या अधिन राहुनच साहित्याचे पुरवठा आदेश देण्यात येतील.

४) पुरवठा आदेशात नमुद केल्याप्रमाणे विहित मुदतीत पुरवठा न केल्यास भांडार नियमावलीनुसार पुरवठा न केलेल्या मालाच्या किमतीच्या प्रति आठवडा ०.५% प्रमाणे कमाल मर्यादा १०% व २ लाखापेक्षा जास्त असल्यास प्रति आठवडा ०.५% प्रमाणे कमाल मर्यादा ५% दंड आकारण्यांत येईल.

५) निविदेतील तपशीला नुसार पालघर जिल्हयातील पुरवठा आदेशासोबत दिलेल्या यादीप्रमाणे प्रकल्पस्तरावर पुरवठा करणे पुरवठादारावर बंधनकारक राहिल.

६) साहित्य पुरवठयाबाबत असमाधानकारक परिस्थिती आढळुन आल्यास किंवा कोणताही वाद निर्माण झाल्यास आपला करार रद्द करण्याचा करण्यांचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. पालघर यांना राहतील.

७) राज्य शासन/केंद्र शासन किंवा जिल्हा परिषदेशी संबधित असलेल्या इसमास या प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही.

८) कोणतेही सशर्त दरपत्रक विचारात घेतली जाणार नाही.

९) दरपत्रकाध्ये नमुद साहित्या संदर्भात न्यायालयीन वाद उद्भल्यास न्यायालयीन ठिकाण पालघर राहील.

१०) मंजुर झालेल्या दरपत्रकधारकाने स्विकृती पत्रानुसार जिल्हा परिषदेशी मुदतीत शासकीय नियमानुसार ग्रामविकास विभाग शासन परीपत्रक दिनांक २०.११.२००९ अन्वये आवश्यक रकमेच्या मुद्रांक कागदपत्रांवर करारनामा कराणे आवश्यक आहे.

११) दरपत्रकामध्ये नमुद केलेला साहित्याचा दर मुल्यवर्धीत कर, GST, वाहतुक खर्च तसेच इतर सर्व अनुषंगिक कर व शुल्कासह असावेत. सदरचे मुल्यवर्धित कर व इतर अनुषंगिक कर शासनखाती भरण्याची जबाबदारी संबधित पुरवठाधारकाची राहील.

१२) नियमानुसार देयकातुन GST, IT व इतर लागू करांची कपात करण्यात येईल.

१३) सदर दरपत्रक मंजूर करणेचा अगर कोणतेही कारण न देता नाकारण्याचा, अटी व शर्ती शिथिल करण्याचा / बदलणेचा अधिकार तसेच कोणत्याही स्तरावर खरेदी प्रक्रीया रद्द करण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पालघर यांचा राहिल.

## <u>दरपत्रकासोबत जोडावयाची कागदपत्रे</u>

१. दरपत्रकधारक यांनी दि.३१.०३.२०२३ पर्यंत GST भरल्याची प्रत.

२. अधिकृत विक्रेता संस्था अथवा कंपनी असल्याचे नोंदणी प्रमाणपत्र / संस्था दुकाने नोंदणीबाबतचे प्रमाणपत्र नुतनीकरणासहित असणे बंधनकारक राहिल.

३. खरेदी प्रक्रियेमध्ये सहभागी होणाऱ्या संस्थेची ३ आर्थीक वर्षाची वार्षिक सरासरी उलाढाल (Average annual turnover) किमान रु ३.०० लक्ष किंवा त्यापेक्षा अधिक असणे आवश्यक असून तसे सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र.

४. पॅन कार्डाची छायांकित प्रत.

५. संस्थेचे नाव काळया यादीत नसल्याबाबतचे किंवा सदर संस्थेस कोणत्याही शासकीय आस्थापनेशी व्यवहार करण्यास बंदी घालण्यांत आलेली नाही अशा आशयाचे स्वलिखित प्रमाणपत्र.

६. मागील तीन आर्थिक वर्षाचा मिळून एकुण रु.३.०० लक्ष मात्र रकमेचा साहित्याचा पुरवठा शासकीय संस्थेस केल्याचा अनुभवाचा दाखला/पुरवठा आदेश. सदर अनुभव दाखला / पुरवठा आदेश मध्ये पुरवठा करण्यात आलेल्या साहित्याची रक्कम व आर्थिक वर्ष या बाबीचा समावेश असणे आवश्यक आहे असे पुरवठा आदेश,

जर मराठी किंवा इंग्रजी व्यतिरिक्त अन्य भाषेत असल्यास या दस्तऐवजांचे मराठी किंवा इंग्रजी स्वयंसाक्षांकित अनुवाद मूळ दस्तऐवजां सोबत सादर करणे आवश्यक आहे.)

७. सादर करण्यांत येणारी सर्व कागदपत्रे स्वाक्षांकित करुन सदर करणे आवश्यक आहे. स्वाक्षांकित नसलेली कागदपत्रे ग्राहय धरली जाणार नाहीत.

(प्रविण भावसार)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी
(बा.क.) जिल्हा परिषद पालघर

**कार्यालयाचा पत्ता** ००५, महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद पालघर, तळमजला, नविन प्रशासकीय इमारत, कोळगाव, पालघर (प)        Email: wcdpalgharzp1@gmail.com